# कार्यालय नगर परिषद, वानाडोंगरी

## तह. - हिंगणा, जिल्हा – नागपूर

जा. क्र. न.प.वा./बांध./ता.प्र.प./ ६३६

दिनांक :- ३०/१०//२०१७

प्रति,

१. एल. जी. डेव्हलेपर्स एन्ड बिल्डर्स,
द्वारा पार्टनर श्री धनराज बाबडे, गोपाल नगर, नागपूर.

२ श्री पवन आर. गुप्ता, प्लानर एन्ड डीझायनर, नागपूर.

**विषय :- महाराष्ट्र शासनाचे नगर पालिका, नगर पंचायत हद्दीकरीता लागु असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार ताबा – प्रमाणपत्राबाबत**

संदर्भ :- १. आपले दि. १२/१०/२०१७ चे विहित नमुन्यातील पुर्णत्वाचे प्रमाणपत्र क्र. १४१३.
२. नगर परिषद, वानाडोंगरी कडील बांधकाम परवाना क्र. न.प.वा./बां.वि./२१२/२०१७, दि. ०९.०५.२०१७

मौजा – वानाडोंगरी, प. ह. क्र. ४६, खसरा क्र. ३०८/बी, भूखंड क्र. १ ते १२ वरील विंग – डी मधील संदर्भित पत्र २ अन्वये परवाना प्राप्त इमारत बांधकाम श्री पवन आर. गुप्ता, प्लानर एन्ड डीझायनर, नागपूर, परवाना क्र. N. I. T. L. S. No. 1969 यांचे देखरेखीखाली पुर्ण केल्याचे संदर्भित पुर्णत्वाचे प्रमाणपत्र १ वरून दिसून येते. उक्त बांधकाम ताब्यात घेण्याबाबत खालील अटी व शर्तीवर मंजूरी देण्यांत येत आहे.

१. उक्त इमारतीचे परिसरात वृक्षारोपन करून त्यांची निगा राखण्याची जबाबदारी धारकाची राहील.
२. उक्त इमारतीचे परिसरात स्वच्छता राखून, परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी धारकाची राहील.
३. उक्त इमारतीमध्ये वा परिसरात मंजूर नकाश्यात दर्शविलेल्या बांधकामाव्यतिरिक्त विना मंजुरीने कोणतेही बांधकाम करू नये. केल्यास ते बांधकाम अवैध समजण्यात येईल.
४. उक्त इमारतीमध्ये वा परिसरात मंजूर नकाश्यात दर्शविलेल्या बांधकामात काही बदल करावयाचे झाल्यास या कार्यालयास पुर्व सुचना देऊन परवानगी घेणे आवश्यक राहील. त्याशिवाय कोणतेही फेरबदल मान्य करता येणार नाही.

वास्तुतद्याचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या बांधकाम नकाशाचे एक संच यासह परत पाठविण्यात येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

प्रशासक,
नगर परिषद, वानाडोंगरी.